आधुनिक विचारांचे

# वर्तमान

बीड । मंगळवार, ३१ ऑगस्ट २०२१ । वर्ष : ३ आपले वृत्तपत्र, आपला आवाज अंक : ४४ । पाने : ४ । मूल्य २ ₹

## शेतकऱ्यांना मिळणार २५ टक्के पीकविमा

बीड : ऑगस्ट महिना संपत येत असताना जिल्ह्यात समाधानकारक पाऊस झाला नाही. त्यामुळे जिल्ह्यातील सोयाबीन, मूग, उडीद उत्पादक शेतकऱ्यांच्या पिके हातातून गेले आहेत. या स्थितीत विमा कंपनीने संभाव्य नुकसानीच्या २५ टक्के विम्या मार्फत शेतकऱ्यांना देण्याचे आदेश जिल्हाधिकारी राधाबिनोद शर्मा यांनी विमा कंपन्यांना दिले आहेत. या आदेशामुळे बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळणार आहे. याबरोबरच अंबाजोगाई तालुक्यातील काही गावांमध्ये फेर सर्वेक्षण होणार आहे.

# ज्योतिराम घुले जिल्ह्याची शान

### पालकमंत्री धनंजय मुंडे यांचे गौरवोद्गार; भारतीय दिव्यांग क्रिकेट संघाचे नेतृत्व बीडकडे

▶ प्रतिनिधी

बीड : आपल्या मेहनत व जिद्दीच्या जोरावर ऊसतोड कामगार कुटुंबातील एक तरूण भारतीय दिव्यांग क्रिकेट संघाचा कर्णधार होतो, ही अत्यंत अभिमानाची बाब असून ज्योतिराम सारखे खेळाडू आमच्या बीड जिल्ह्याची शान आहेत, असे राज्याचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे.

भारतीय आंतरराष्ट्रीय दिव्यांग क्रिकेट संघाचे सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस बांगलादेश विरुद्ध कसोटी व एकदिवसीय सामने होत आहेत. या सामन्यांच्या पूर्वसरावासाठी ज्योतिराम व सहकारी जाणार आहेत, तत्पूर्वी मंत्री धनंजय मुंडे यांची त्यान



सदिच्छा भेट घेतली. यावेळी मंत्री मुंडे यांनी ज्योतिराम घुले व सर्व टीमला बांगलादेश सोबत होणाऱ्या क्रिकेट मालिकेसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस होणाऱ्या मॅचला स्वतः पाहायला येणार असल्याचेही धनंजय मुंडे म्हणाले. दरम्यान, केज तालुक्यातील डोनगाव येथील सामान्य ऊसतोड कामगार कुटुंबातील ज्योतिराम हा तरुण, शालेय शिक्षणापासूनच खेळाची त्याची आवड त्याने जोपासली. क्रिकेट बरोबरच धनुर्विद्येत देखील ज्योतिरामचे नावलौकिक केलेला आहे. दिव्यांग असतांना ज्योतिराम याने क्रिकेट आणि धनुर्विद्या या दोन क्षेत्रात यश मिळवत इच्छाशक्ती असेल तर मनुष्य अडचणींवर मात करत यश मिळवता येते, हेच दाखवून दिले आहे.



# रेल्वेमार्गाचे काम वेगाने व्हावे

### नगर-बीड-परळी रेल्वेमार्ग प्रश्नी जयदत्त क्षीरसागर-रावसाहेब दानवे भेट

▶ प्रतिनिधी

बीड : नगर-बीड-परळी रेल्वे मार्गाचे ३० किमीचे काम पूर्ण व ३० किमीचे काम प्रगतिपथावर असून, या मार्गावर रेल्वे सुरू करण्यासाठी तातडीने चाचणी घेण्यात यावी. उर्वरित बीड ते परळी रेल्वे मार्गाचे काम जलदगतीने पूर्ण करण्यात यावे, अशी मागणी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्याकडे केली आहे.

२६ ऑगस्ट रोजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांची औरंगाबाद येथे माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी भेट घेतली. मुंबई ते नागपूर हा समृद्धी मार्ग सुरू होत आहे. या मार्गाच्या समांतर मुंबई ते नागपूर बुलेट ट्रेनचा प्रस्ताव तयार करण्यात यावा. देशात नवीन बुलेट ट्रेनसाठी प्रस्ताव तयार करण्यात येत आहेत. त्या नवीन मार्गामध्ये या मार्गाचा समावेश करण्यात यावा. या रेल्वे मार्गामुळे मराठवाडा व विदर्भाचे दळणवळण सुधारेल आणि औरंगाबाद व नागपूर या शहरातील व्यापार व उद्योग वाढीसाठी मोठा फायदा होऊ शकेल. या नवीन रेल्वे मार्गाची योग्यता तपासून सर्वेक्षण करण्यात यावे, अशी विनंती माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्याकडे केली आहे.

# मनरेगा घोटाळा प्रकरणी कोणाची गय नाही

### रोजगार हमी योजना मंत्री संदीपान भुमरे पाटील यांचा इशारा

▶ प्रतिनिधी

बीड : जिल्ह्यात नरेगा गैरव्यवहार प्रकरणात दोषींवर कारवाई केली जाईल, मग तो कोणत्याही पक्षाचा असो, असा इशारा रोहयो व फलोत्पादन मंत्री संदिपान भुमरे पाटील यांनी दिला आहे.



बीड जिल्हाधिकारी कार्यालयात शनिवारी रोहयो व फलोत्पादन मंत्री संदिपान भुमरे पाटील यांनी बैठक घेत नरेगाच्या कामाचा आढावा घेतला तसेच घोटाळ्यासंदर्भात कारवाईच्या सूचना प्रशासनाला दिल्या. यावेळी पत्रकारांनी बीडचे शिवसेना जिल्हाप्रमुख यांच्या गावातील घोटाळ्या संदर्भात प्रश्न विचारला असता माझ्याकडे तक्रार आलेली नाही शासन आम्हीच आहोत. दोषी असेल तर कारवाई होणार मग तो कोणीही असो त्यांच्यावर कारवाई होणारच काय घोटाळा आहे तो पाहू असे उत्तर दिले. बीड जिल्ह्यात नरेगाच्या कामात मोठा गैरव्यवहार झाल्याचे सांगत जिल्हाधिकारी यांची तडकाफडकी बदली करण्याचे आदेश मुंबई हायकोर्टाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिल्यानंतर आता राज्य सरकारला जाग आली असून रोहयो मंत्री यांनी बीड जिल्हा प्रशासनाचे बैठक घेऊन कामा संदर्भात माहिती घेतली. दोषींवर कारवाई केली जाईल असे सूचक वक्तव्य केल्यामुळे जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे. २०११ ते २०१९ या आठ-नऊ वर्षात बीड जिल्ह्यात रोजगार हमी योजना अर्थात नरेगा अंतर्गत कोट्यवधी रूपयांची कामे केल्याचे कागदोपत्री दाखवण्यात आले. या संदर्भात मुंबई हायकोर्टाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल करण्यात आली होती या याचिकेवर सुनावणी करताना जिल्हा अधिकारी न्यायालयाला योग्य माहिती देत नाहीत. म्हणून जिल्हाधिकाऱ्यांच्या बदलीचे आदेश देण्यात आले होते. या नंतर बीड जिल्ह्यात नरेगाच्या घोटाळा हा विषय चर्चेला आला होता न्यायालयाच्या आदेशानंतर राज्य सरकारला जाग आली. असून रोहयोमंत्री संदिपान भुमरे यांनी शनिवारी बीड जिल्हा दौऱ्यावर येत रोहयोच्या कामाची पाहणी करत जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये आढावा बैठक घेतली. या बैठकीमध्ये जिल्हाधिकारी यांना कारवाईच्या अनुषंगाने सूचना दिल्या. तसेच नरेगाच्या रखडलेल्या कामासंदर्भात शेतकऱ्यांच्या थकित बिले संदर्भात देखिल जिल्हा प्रशासनाला सूचना दिल्या.

## विष्णुपंत सोळंकेंची जिल्हा नियोजन समितीवर वर्णी

▶ प्रतिनिधी



परळी : पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली काँग्रेसचे ज्येष्ठ नेते ॲड.विष्णुपंत सोळंके यांची राज्य जिल्हा नियोजन समितीवर नियुक्ती केली आहे. शासनाचे उपसचिव वि.फ.वसावे यांच्या स्वाक्षरीने नियुक्तीचे आदेश जारी झाले. विष्णुपंत सोळंके हे राज्याच्या सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाचे विद्यमान उपाध्यक्ष आहेत. या माध्यमातून त्यांनी प्रत्येक वर्षी शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करत निर्णय घेतलेले आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेवूनच ही निवड करण्यात आल्याची चर्चा होत आहे.

# आमदार प्रकाश सोळंके यांच्या नेतृत्वाखाली कार्य करणार

### युवा नेते भागवत दराडे यांची ग्वाही


▶ प्रतिनिधी

माजलगाव : माजलगाव मतदारसंघाचे भाग्यविधाते माजी मंत्री तथा विद्यमान आमदार प्रकाश सोळंके यांच्या कुशल नेतृत्वाखाली काम करणार असल्याची ग्वाही राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे बीड जिल्हा सरचिटणीस भागवत दराडे यांनी दिली.



पुढे बोलताना भागवत दराडे म्हणाले, माजलगाव मतदारसंघाचा कायापालट केवळ प्रकाश सोळंके हेच करू शकतात. एक विकासात्मक नेतृत्व म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात प्रकाश सोळंके यांची ओळख आहे. राष्ट्रवादी काँग्रेसने दिलेली जबाबदारी पार पाडण्यासाठी आमदार प्रकाश सोळंके, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष महेबूब शेख, युवा नेते तथा जिल्हा परिषदेचे सभापती जयसिंग सोळंके यांच्या नेतृत्वाखाली काम करून राष्ट्रवादी काँग्रेसचे व्यापक संघटन उभे करणार असल्याचेही दराडे म्हणाले. ते जयसिंग सोळंके यांचे कट्टर समर्थक असल्याचे सर्वत्र परिचित आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा खासदार शरद पवार यांचे विचारांप्रमाणे कार्यरत राहणार असल्याचे दराडे म्हणाले.

### भागवत दराडे यांचे कार्य उल्लेखनीय : प्रकाश सोळंके



भागवत दराडे जनसामान्यांचा आवाज असून अल्पावधीत सामाजिक क्षेत्रात त्यांनी वेगळे स्थान निर्माण केले आहे. दराडे यांचे कार्य उल्लेखनीय असल्याचे गौरवोद्गार आमदार प्रकाश सोळंके यांनी एका कार्यक्रमाप्रसंगी काढले.

## काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षपदी राजेसाहेब देशमुख

▶ प्रतिनिधी

बीड : जिल्हा काँग्रेस कमिटीच्या जिल्हाध्यक्षपदी राजेसाहेब किसनराव देशमुख यांची निवड झाली आहे. प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी त्यांना नियुक्तीपत्र दिले आहे.



राजेसाहेब देशमुख हे अंबाजोगाई तालुक्यातील माकेगाव येथील रहिवासी असलेले देशमुख हे चळवळीतील कार्यकर्ते आहेत. ते जिल्हा परिषदेचे सदस्य आहेत. बीड जिल्हा शिक्षण समिती सभापती, अंबाजोगाई पंचायत समितीचे उपसभापती, अंबाजोगाई बाजार समितीचे संचालक अशा विविध पदावर त्यांनी काम केलेले आहे.

अंबाजोगाई येथे मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने झालेल्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे ते स्वागताध्यक्षही होते. दरम्यान, राजेसाहेब देशमुख यांच्या निवडीने जिल्ह्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांमधून समाधान व्यक्त केले जात आहे. काँग्रेसचे संघटन वाढण्यासाठी तसेच तरुणांना पक्षाच्या विचारप्रवाहात आणण्यासाठी देशमुख यांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. ते ती कशी सांभाळतात, याकडे सर्वांचे लक्ष आहे.






# युवा नेतृत्व गोविंद केकान यांचे सामाजिक दायित्व

### तेलगाव पंचक्रोशीतील शाळांना विविध शालेय साहित्याचे वाटप

▶ प्रतिनिधी

किल्लेधारूर : उद्योग आणि सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असलेले युवा नेतृत्व गोविंद महादेव केकान यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त सामाजिक दायित्व दाखवत तेलगाव पंचक्रोशीतील शाळांना आवश्यक उपकरणे साहित्य मोफत दिली आहेत. ३० ऑगस्ट रोजी वाढदिवसाचे औचित्य साधून विविध उपक्रमांचे आयोजन गोविंद केकान यांच्या समर्थकांमार्फत करण्यात आले होते.

तेलगाव, कारी, भोपा, कोथिंबीरवाडी, संगम, देवदहीफळ आणि चाटगाव येथील शाळांना आवश्यक उपकरणे, साहित्य मोफत वाटप करण्यात येणार आहे. यात संगणकीय संच, एलईडी टिव्ही, डायस आदी शालेय उपकरण साहित्यांचा समावेश आहे. तेलगाव पंचक्रोशीतील शाळांना लागणारे विविध शैक्षणिक साहित्य आपल्या वाढदिवसानिमित्त मोफत वाटप करून एक सामाजिक दायित्व गोविंद केकान यांनी दाखवून दिले आहे. दिनांक २९ ऑगस्ट रोजी दिंद्रुड येथे त्यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरात रक्तदात्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून प्रतिसाद दिला. तब्बल ५१ जणांनी रक्तदान केले. दिनांक ३० ऑगस्ट रोजी सायंकाळी चाटगाव येथील हनुमान मंदिराच्या प्रांगणात महाराष्ट्रातील प्रख्यात प्रबोधनकार ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज पठाडे (कर्जत) यांचे किर्तन मोठ्या उत्साहात पार पडले. या किर्तन सोहळ्यानंतर गोविंद केकान यांच्या समर्थकांमार्फत वाढदिवसाचा मुख्य कार्यक्रम घेण्यात आला. ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज पठाडे यांच्या किर्तन सोहळ्याला पंचक्रोशीतील भाविकभक्तांनी हजेरी लावली.

### समाजाचे आपण देणेकरी लागतो : गोविंद केकान

समाजातील शेवटच्या घटकांना आधार देणे गरजेचे असून समाजाचे आपण काहीतरी देणेकरी लागतो, याच भावनेतून वाढदिवसाचे निमित्त साधून शाळांना मोफत शालेय साहित्य, गरिब व गरजू कुटुंबांना मोफत धान्याचे वाटप करण्यात आले, असल्याची प्रतिक्रिया युवा नेते गोविंद महादेव केकान यांनी दिली. तेलगाव पंचक्रोशीतील गरीब, गरजू लोकांच्या हाकेला ओ देणे आपले परम कर्तव्य असल्याची भावनाही केकान यांनी व्यक्त केली.

## संपादकीय

# गतिमान अर्थव्यवस्थेसाठी हवी ठोस उपाययोजना

आपल्या अर्थव्यवस्थेची नीट घडी बसवताना काही ठोस निर्णय घेण्याची गरज आहे. आमुलाग्र बदल करण्यासाठी उपाययोजना अंमलात आणणे काळाची गरज आहे. देशाची आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक रचना बदलणाऱ्या एका ऐतिहासिक घटनेला आता ३० वर्ष पूर्ण होत आहेत. या घटनेची नव्याने नोंद घेण्यामागील कारण म्हणजे आजच्या देशाच्या लोकसंख्येपैकी ६० टक्के भारतीय या घटनेनंतर जन्माला आले आणि उर्वरित ४० टक्के भारतीयांनी या घटनेआधीची आणि नंतरची परिस्थिती अनुभवलेली आहे. १९९१ मध्ये भारताची नवी व्यापार धोरणे, आयात-निर्यातीचे नवे नियम, रूपयाचे अवमूल्यन, सार्वजनिक क्षेत्राची स्वत:ची अशी मक्तेदारी नष्ट होणे, लायसन्स राज रद्द होणे, निर्यातीला प्रोत्साहन, जाचक एमआरसीपी कायदा रद्द होणे, कंपन्यांचे विलीनीकरण तसेच कंपन्या ताब्यात घेण्याच्या प्रक्रियेला गती मिळणे आणि परदेशातल्या गुंतवणुकीसाठी तत्काळ मंजुरी मिळणे आदी सुधारणांना विशेष महत्त्व आहे. एकूण काय, तर या देशात व्यापार करण्यासाठी शक्य तितक्या सगळ्या सुविधा देण्याचा प्रयत्न त्या वेळच्या सरकारने केला आणि त्यात भर पडली ती १९९१च्या अर्थसंकल्पाची. त्यावेळी नरसिंह राव हे पंतप्रधान होते आणि डॉ.मनमोहन सिंह हे अर्थमंत्री होते. या दोघांनी हा सुधारणेचा रेटा पुढे ढकलला. अर्थात त्यावेळी सुरू झालेल्या प्रगतीच्या चक्रातून जागतिकीकरण, उदारीकरण आणि खासगीकरण यांना चालना मिळाली. १९९९मध्ये आलेले नवे टेलिकॉम धोरण, मोदी सरकारच्या काळात आलेला वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) किंवा त्यानंतर आलेलं इन्सॉल्व्हंसी आणि बँक्रप्सी कोड, काही प्रमाणात आलेले मजूरविषयक कायदे, अलीकडच्या काळात वादग्रस्त ठरलेल्या शेतीच्या सुधारणा हे सगळे त्याच एका विचारधारेच्या प्रक्रियेचा भाग आहे. त्याची गंगोत्री म्हणून १९९१चा अर्थसंकल्प आणि आर्थिक सुधारणा यांचे महत्त्व आहे. उघडे दरवाजे आणि खिडक्यांमधून मोकळी हवा आत यावी तसंच या देशाची अर्थव्यवस्थादेखील अधिकाधिक खुली व्हावी, यासाठी ३० वर्षांपूर्वी वेगळी विचारधारा आवश्यक होती. याआधीचा वसाहतवादाचा दृष्टिकोन आता फारसा उपयोगी पडणार नाही, हे १९८०च्या दशकात उमगायला लागले होते आणि त्याचीच परिणती १९९१च्या आर्थिक सुधारणांमधून झाली होती. ज्या वेळी समाजामध्ये बाहेरून येणाऱ्या संकल्पनांचा, उत्पादनांचा स्वीकार केला जातो, तिथली स्पर्धा स्वीकारली जाते तेव्हाच समाजाची प्रगती होत असते. तसेच स्पर्धा आली की, गुणवत्ता येतेच यावर आमचा विश्वास बसायला लागला. १९९१नंतर दारिद्र्यरेषेखाली जगणाऱ्यांची संख्या जेवढी दारिद्र्यावर गेली तेवढी ती आधीच्या कोणत्याही दशकात दिसली नव्हती.

त्या काळी परदेशी वस्तू ही दुष्प्राप्य आणि बघायला दुर्मीळ असायची. त्यामुळे परदेशी जाणं ही खूप मोठी गोष्ट होती. आपल्या आधीच्या पिढीतल्यांचे लहानपणचे फोटो काढून बघितल्यास लक्षात येते की, एकच कपड्याचा तागा आणून त्यातून बहिणींना सारखे फ्रॉक किंवा भावांना सारखे शर्ट किंवा पँट शिवल्या जायच्या. सकाळी उठल्यावर सरकारी दूध केंद्रांवर रांग लावून दुधाच्या बाटल्या घेऊन यायचा हा जीवक्रम होतो. त्या काळात नव्या स्कूटरपेक्षा सेकंड हँड स्कूटर जास्त महाग असायची. कारण नवी स्कूटर मिळायला पाच ते सात वर्षांचा कालावधी जायचा, तर जुनी स्कूटर तत्काळ उपलब्ध व्हायची. त्या काळात कोणत्याही गोष्टीच्या तुटवड्याचे आम्हाला काहीच वाटत नव्हते. त्या तुटवड्यामुळे भ्रष्टाचारदेखील भरपूर झाला आणि एक प्रकारे त्याचीच परिणती इंदिरा गांधींचे सरकार कोसळण्यात झाली. इंग्लंडमध्ये पन्नास-साठच्या दशकात सुधारणेचा रेटा आला. ऑस्ट्रेलियामध्ये ७०च्या दशकात आला. आम्ही मात्र तो आणण्यासाठी २० वर्ष वाया घालवली आणि या काळात चीन बाजी मारून गेला. खासगीकरण आणि खासगी उद्योजकांबद्दल नेहरूंचे मत निश्चित चांगले नव्हते. म्हणूनच त्यांनी खूप मोठे सहकारी उद्योग उभारण्यावर भर दिला. त्यावेळी अशी एक विचारधारा होती की, एखादी गोष्ट सरकारने केली नाही, तर खासगी क्षेत्र ते करणार नाही आणि केले तर त्यांचा कारभार खूप ढिसाळ असेल. खरे तर, त्या काळात सर्व बँकांवर आणि वित्तसंस्थांवर सरकारचे कठोर नियंत्रण होते. कोणत्याही प्रकारच्या संशोधनाला अजिबात वाव नव्हता. तसेच कोणतेही नियोजन शेवटच्या पातळीवरून करण्यापेक्षा दिल्लीतल्या बाबूंनी करायची आणि आपण ते राबवायचे, अशाच प्रकारची एक कार्यपद्धती होती. संपत्ती निर्माण करणे हा एक प्रकारे गुन्हाच मानला गेलेला होता आणि म्हणूनच की काय तुम्ही उच्च उत्पन्न गटात असाल, तर त्यापैकी ९७ टक्के रक्कम कर म्हणून भरावी लागायची. त्यामुळे उद्योजक निर्माणच होत नव्हते. गरिबी हटाव'च्या फक्त घोषणा दिल्या गेल्या. मात्र गरिबी हटवण्यासाठी कोणतेही ठोस उपाय योजले गेले नाहीत. या सगळ्यांचा परिणाम आपल्या अर्थव्यवस्थेवर झाला. परकीय गंगाजळी आटली. वित्तीय तूट गगनाला भिडली.

१९७३च्या आखाती देशांमधल्या युद्धामुळे तेलाचे दर कडाडले. त्यामुळे तेलखरेदीसाठी परकीय चलन मोठ्या प्रमाणावर खर्च होऊ लागले. या सगळ्याचे पर्यावसन म्हणून आम्हाला देश चालवण्यासाठी सोने गहाण टाकून कोणत्याही परिस्थितीत देशासाठी निधी उभा करावा लागला. त्याच वेळी रशियेचे विघटन झाले आणि दक्षिण कोरियाने अर्थव्यवस्थेत बदल करून एक प्रकारे प्रचंड भरारी मारली. या वातावरणात भारताच्या सुधारणेची चौकटच निर्माण होत होती. हे सगळे घडले आणि त्यानंतरचे आयुष्य आपल्यासमोर आहे. आर्थिक सुधारणा झाल्या असल्या तरी अजून बरेच काही बाकी आहे. ३० वर्षांनंतर पुन्हा एकदा १९९१सारख्याच दणदणीत आर्थिक सुधारणा करण्याची संधी आज आपल्यासमोर आहे. आज कोरोनाच्या साथीनंतर आमची अर्थव्यवस्थाच नाही, तर मानसिक अवस्थाही खिळखिळी झाली आहे. ही संपूर्ण अवस्था पुन्हा बदलायची असेल, तर काही मूलभूत बदल अपेक्षित आहेत. आजही काही ठिकाणी असलेलं परमिट राज काढावे लागणार आहे. राजकारणाचे गुन्हेगारीकरण आणि नोकरशाही विरुद्धचे कडक पाऊल या सरकारला उचलावं लागणार आहे. त्याचबरोबरच जमीन सुधारणा कायदा तसंच मजुरांशी संबंधित कायदे कठोरपणे राबवावे लागतील. व्यवसाय सुलभीकरणासाठी म्हणून इतर काही बदल करावे लागणार आहेत. कोरोनाकाळात अनेक लोक दारिद्र्यरेषेखाली ढकलले गेले आहेत.

# भारताचे लोकाभिमुख स्वातंत्र्य

**एखादा देश परकीयांच्या गुलामीत असतो तेव्हा फक्त त्या देशाचीच नाही तर देशातल्या लोकांना जन्मतः मिळालेली सगळ्या प्रकारची स्वातंत्र्य बंधनात असतात. १५ ऑगस्टला देशाला राजकीय स्वातंत्र्य तर मिळालं. पण देशातल्या लोकांपर्यंत स्वातंत्र्य पोचवलं ते संविधानानेच. त्यामुळे गेल्या १५ ऑगस्ट २०२१ रोजी अमृतमहोत्सवी वर्षाची सुरूवात झाली. हे स्वातंत्र्य चिरायू ठेवण्यासाठी भारतीय संविधानासारखा दुसरा दीपस्तंभ नाही हे लक्षात ठेवायला हवं.**

विशेष

**राजवैभव शोभा रामचंद्र**

१५ ऑगस्ट १९४७, भारत एक सार्वभौम देश बनला. म्हणजेच भारताचा राज्यकारभार जो ब्रिटनच्या पार्लमेंटमधे चालत होता, देशाच्या निर्णय प्रक्रियेची सगळी सूत्र तिथून हलत होती, ती भारतीयांच्या हाती आली. यापुढे देशाचे सगळे निर्णय भारत स्वतः घेईल याची बीजं रोवली गेली होती. भारत एक स्वतंत्र देश म्हणून अस्तित्वात आला. १५ ऑगस्ट २०२१ रोजी या घटनेला ७४ वर्ष झाली. भारत अमृतमहोत्सवी वर्षात पोचला. पण या वाटचालीकडे पाहत असताना स्वातंत्र्याचा लढा, त्या संघर्षात सर्वार्थाने उतरलेले हुतात्मे, क्रांतिकारक, सत्याग्रही, महामानव यांना आणि त्यांच्या आहुतीला आपण नजरेआड करता कामा नये.

नवा समाज घडवायचाय

एखादा देश परकीयांच्या गुलामीत असतो तेव्हा फक्त त्या देशाची नव्हे तर देशातल्या लोकांची जन्मतः मिळालेली सगळ्या प्रकारची स्वातंत्र्य बंधनात असतात. त्यांचा उपभोग त्यांना घेता येत नाही. देश राजकीय दृष्ट्या स्वतंत्र बनवायचाय म्हणून सर्वसामान्य लोकांपासून ते अनेक विभूतीपर्यंत सर्वांनीच कंबर कसली. यात दलित, आदिवासी, कष्टकरी, कामगार महिलांपासून लोकांना जगण्याचा मार्ग देणाऱ्या विचारवंतांपर्यंत अनेकांनी आपलं समर्पण दिलं. त्या सगळ्यांच्या मनातल्या स्वातंत्र्याच्या संकल्पनाही वेगवेगळ्या होत्या. आझादी मेरी दुल्हन म्हणणारे भगतसिंग म्हणतात, स्वातंत्र्य हा प्रत्येक माणसाचा उल्लंघन करता येऊ शकत नाही असा अधिकार आहे. प्रत्येक माणसाला आपल्या श्रमाचं फळ उपभोगण्याचा सर्व प्रकारचा अधिकार आहे आणि प्रत्येक देश आपल्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा मालक आहे. कोणतंही सरकार जनतेला तिच्या अधिकारापासून वंचित ठेवत असेल तर असं सरकार नष्ट करणं हा केवळ अधिकारच नाही तर जनतेचं आवश्यक कर्तव्यही बनतं. आम्हाला नवा समाज घडवायचा आहे. माणसांकडून माणसांचं होणारं शोषण अशक्य करून सर्वांना सगळ्या क्षेत्रांमधे संपूर्ण स्वातंत्र्य हे वास्तव बनावं' भगतसिंगांचा हा समग्र स्वातंत्र्याचा विचार आपण नीट समजून घेत आपली दिशा निश्चित करायला हवी.

नेहरुंचं काम आपल्या हाती

१४ ऑगस्ट १९४९ ला संविधान सभेत केलेल्या भाषणात पंडित जवाहरलाल नेहरू म्हणाले होते, आम्हाला देशाला स्वतंत्र करायचं होतं. विदेशी सत्तेला इथून घालवायचं होतं. ते काम आता पूर्ण झालं. पण विदेशी सत्ता गेल्याने स्वातंत्र्याची इतिश्री होत नाही. जोपर्यंत भारतातला एक एक माणूस स्वतंत्र हवेत श्वास घेत नाही, त्याच्यावरची संकटं दूर होत नाहीत, त्यांच्या दुःखाचं निवारण होत नाही तोपर्यंत आपली जबाबदारी पूर्ण होत नाही.' भारत कोणत्याही एका धर्माचा देश नाही. एका संप्रदायाचा देश नाही. याउलट तो अनेक जाती-धर्माच्या विविधता असलेल्या लोकांचा देश आहे. यात अनेक धर्म आणि संप्रदाय आहेत. आम्हाला कोणत्या प्रकारचं



स्वातंत्र्य हवं आहे आमच्या वतीने हे आधीच स्पष्ट करण्यात आलंय. ते स्वातंत्र्य प्रत्येक भारतीयांचं भारतीयांच्यासाठी आहे. त्यावर प्रत्येक भारतीयाचा समान हक्क आहे आणि प्रत्येक भारतीयांना या स्वातंत्र्यात समान भागीदार करून घ्यायचं आहे' नेहरुंचं हे काम आता आपल्या हाती सोपवलं गेलंय याची जाणीव कधी येणार? डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्वातंत्र्य मूल्याला विभक्त पद्धतीने पाहत नाहीत. त्यांच्या मते, 'स्वातंत्र्य समता बंधुता या मूल्यांचा एक संच आहे. ती एकमेकांपासून वेगळं करण्याचा प्रयत्न केला तर लोकशाहीचा मूळ हेतू नष्ट होऊन जाईल. समतेशिवाय स्वातंत्र्य म्हणजे बहुसंख्यांवर अल्पसंख्यांकांचं प्रभुत्व. स्वातंत्र्याशिवाय समता असेल तर ती वैयक्तिक कर्तृत्व नाहीसं करु शकते आणि बंधुभाव नसेल तर स्वातंत्र्य आणि समता यांचा नैसर्गिक विकास होऊ शकणार नाही'

मेंदूची काळजी संविधानाने घेतली

स्वातंत्र्याबद्दल असणारी ही व्यापक संकल्पना संविधान सभेतल्या सगळ्या संविधानकारांनी भारतीय संविधानात आणली. लोकांचं स्वातंत्र्य हे मूलभूत तत्त्व समजून संविधानाचा पाया रचला गेला. फक्त अनुच्छेद, कलमं यातच नाही तर भारताच्या प्रास्ताविकेतही व्यक्तीच्या स्वातंत्र्याला स्थान दिलं गेलं. ही स्वातंत्र्यं म्हणजे विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा आणि उपासना. आपण थोडं अधिक विस्ताराने याकडे पाहूया. विचार स्वातंत्र्य, विचार करण्याचं स्वातंत्र्य! आपल्या सर्वांना माहीत आहे की, माणसाच्या शरीरात विचार करण्याचं काम मेंदू करतो. या देशात जितके लोक आहेत त्या प्रत्येक व्यक्तीच्या डोक्यात मेंदू आहे. तो विचार करू शकतो. मग देशातल्या संविधानात आणि विशेषत: प्रास्ताविकेत विचार स्वातंत्र्य अशी गोष्ट का बरं आणावी लागली? तीही लिखित स्वरूपात? जगभराचा इतिहास पाहता धर्मसत्तेने लोकसत्तेवर अनेक वेळा अनेक बंधनं घालण्याचा प्रयत्न केलाय आणि विचार करणाऱ्या मेंदूनी जुलमी धर्मसत्तेवर वारंवार प्रहार केलेत. विचार करणाऱ्या आणि विचार करायला प्रवृत्त करणाऱ्या अनेकांना धर्मसंस्थेने शिक्षा दिलीय. सॉक्रेटिस, तुकाराम ही नाव आपल्या आठवणीत कायमच राहतील. अशी परिस्थिती स्वतंत्र असलेल्या भारतात होऊ नये, विचार करण्याचं स्वातंत्र्य इथल्या प्रत्येक व्यक्तीला मिळावं, म्हणून तुमच्या आमच्या मेंदूची काळजी संविधानाने घेतली आणि हे विचार करण्याचं स्वातंत्र्य मान्य केलं.

स्वातंत्र्य उपभोगताना करायची गोष्ट

केलेला विचार आपण कोणत्याही माध्यमातून मांडू शकतो. ते मांडण्याचं स्वातंत्र्य आणि हक्कही संविधानाने मान्य केलाय. हे अभिव्यक्ती स्वातंत्र्य उपभोगत असताना फक्त एकाच गोष्टीचं भान इथल्या सुजाण भारतीयांनी ठेवायला हवं. इतर कोणत्याही व्यक्तीचं कोणत्याही प्रकारच्या स्वातंत्र्याचा उल्लंघन होणार नाही ही एकच गोष्ट नीट केली तर खऱ्या अर्थाने स्वतःच्या आणि इतरांच्या स्वातंत्र्याची किंमत कळू शकते. या अभिव्यक्ती सोबतच स्वातंत्र्याच्या हक्कात शांततेत आणि विनाशस्त्र एकत्र जमण्याचा, संघ बनवण्याचा, भारतात कुठेही जाण्याचा, देशाच्या कोणत्याही भागात राहण्याचा किंवा तिथेच जाऊन बस्तान बसवायचा, आपल्याला आवडतं ते कोणतही काम करण्याचा हक्क मान्य करण्यात आला. देशाचं सार्वभौमत्व, अखंडता आणि सार्वजनिक सुव्यवस्था यांत काही गडबड होऊ नये यासाठी या सगळ्या हक्कांवर काही बंधनंही घालण्यात आली. धर्मनिरपेक्षतेच्या मूल्यामुळे धर्माबद्दलचे सगळे निर्णय घेण्याचं स्वातंत्र्य आपोआपच आपल्याला मिळालं. भारतीय संविधानातल्या कलम २५ मधे आपला धर्म कोणता आहे हे दाखवण्यासाठी काही टोपी, टिळा, केसांची रचना करणं, आपल्या धर्मात इतरांनी सामील व्हावं यासाठी त्याचा प्रचार करण्याचा अधिकार या देशातल्या सगळ्या व्यक्तींना सारखा दिलाय. विश्वास, श्रद्धा आणि उपासना म्हणजे आपल्याला ज्यांच्यावर विश्वास ठेवायचाय, श्रद्धा ठेवायचीय, ज्याची पुजा करायचीय ते करण्याचं स्वातंत्र्य आपल्याला आहे अशी शाश्वती संविधानाने या देशातल्या समस्त भारतीयांना दिलीय. पण ही सगळी स्वातंत्र्य उपभोगताना सदसद्विवेक बुद्धीने आपण कितपत वागू यावर देशातल्या धर्मनिरपेक्षता या मूल्याचं भविष्य अवलंबून आहे.

शंभर मार्क की नापास?

गेल्या ७५ वर्षात स्वातंत्र्यामुळे आणि संविधानातल्या मूल्यांमुळे भारतीयांना एक मोकळं आकाश मिळालंय. या सगळ्या प्रवासाला अगदी शंभर गुण देता येणार नसले तरी नापासही करता येणार नाही असा विकास स्वातंत्र्योत्तर काळामधे भारताच्या लोकशाहीने, समाजव्यवस्थेने केलाय. तथाकथित खालच्या समजल्या जाणाऱ्या जातीतल्यांना आणि महिलांना शिक्षणाची बंदी इथंपासून ते सगळ्यांना मोफत आणि सक्तीचं शिक्षण इथपर्यंतचा प्रवास असेल. वंचित घटकांच्या विकासासाठी सामाजिक न्याय विभागाने राबवलेल्या आज पर्यंतच्या अनेक योजना असतील. महिला आणि लहान मूलं यांच्या विकासासाठी काही गोष्टी करणं आवश्यक होतं. त्या सगळ्या झाल्यात असं नाहीच. पण त्यातल्या काही गोष्टी असतील, सर्वसामान्य व्यक्तीच्या हातातही सत्ता असायला हवी या हेतूने पंचायत राज व्यवस्थेचा होत असलेला विकास असेल, अशा अनेक गोष्टीत एक एक पाऊल पुढे टाकत आपण जात आहोत. भारतीय स्वातंत्र्याला मजबुती आणणाऱ्या या अशा काही गोष्टी देशात घडल्याच. पण स्वातंत्र्य कमी करणाऱ्याही गोष्टी घडून गेल्या. घोषित आणि अघोषित आणीबाणी झाली. देशातल्या दोन पंतप्रधानांचे खून झले. देशाला धर्माचा विचार करून काही निर्णय घ्यावे लागले. देशभरात अनेक जातीय हत्या, धार्मिक दंगली झाल्या. समाजाच्या न्यायासाठी लढणाऱ्या आंदोलकांवर हल्ले झाले.

संविधान जपणं हेच देशप्रेम

या सगळ्यातून वाटचाल करत देशाचा पाया रचणाऱ्यांना अपेक्षित असणारा देश घडवण्यासाठी काय करावं लागेल याची सगळी उत्तर मिळतात ती भारतीय संविधानामधे! देशाचं स्वातंत्र्य हे सर्वसामान्यांचं स्वातंत्र्य बनायला हवं असं वाटत असेल तर संविधानिक मूल्यांची कास आपण लवकरात लवकर करायला हवी. संविधानाच्या मूल्यांना अनुसरून केलेली प्रत्येक कृती म्हणजे देशभक्ती आहे, ही भावना आपल्यात रुजायला हवी. या देशभक्तीची पहिली पायरी कुठली असेल तर या संविधानाच्या प्रास्ताविकेचा अर्थ समजावून घेणं. देशाच्या स्वातंत्र्याला बाहेरच्या काही गोष्टींमुळे आता फारसा धोका उरलेला नाहीच. तर देशांमधल्याच लोकांकडून होणाऱ्या मूल्याच्या विरोधातल्या गोष्टी देशाचं स्वातंत्र्य धोक्यात आणू शकतात. भारताचे हे स्वातंत्र्य चिरायू ठेवायची जबाबदारी आज आपल्या सगळ्यांची आहे. ती जबाबदारी कशी पार पाडावी यासाठी भारतीय संविधानासारखा दुसरा दीपस्तंभ नाही. संविधानाचा प्रचार प्रसार आणि अंगीकार आणि यासोबत त्याच्या अंमलबजावणीसाठी कृतीशील भूमिका बजावण्याचा संकल्प करत यंदाचा स्वातंत्र्यदिन आपण साजरा केला. भारताच्या आदर्श संविधानामुळे आपले स्वातंत्र्य लोकाभिमुख झाले आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

# हवा प्रदुषण रोखणारे स्मॉग टॉवर

**दिल्लीच्या स्मॉग टॉवरची सध्या देशभर चर्चा होतेय. हिवाळ्यामधे दिल्ली धूळ-धुराने माखलेली असते. हवेच्या प्रदूषणामुळे हे राजधानीचं शहर जगातलं टॉपचं प्रदूषित शहर बनलंय. या सगळ्या पार्श्वभूमीवर दिल्लीतलं स्मॉग टॉवरचं मॉडेल दूषित हवेवर प्रक्रिया करून स्वच्छ हवा लोकांपर्यंत पोचवेल. यानिमित्ताने हवा प्रदूषणामुळे जीव कोंडलेल्या दिल्लीकरांना मोकळा श्वास घेता येईल.**

पर्यावरण

**अक्षय शारदा शरद**

स्वित्झर्लंडची 'आयक्यू एयर' ही प्रदूषणावर काम करणारी संस्था आहे. दरवर्षी ही संस्था जगभरातल्या वेगवेगळ्या देशांचा 'हवेचा गुणवत्ता निर्देशांक' जाहीर करत असते. यावर्षीच्या रेटिंगनुसार प्रदूषणामधे जगातल्या ५० पैकी शहरांपैकी ३५ शहरं भारतातली आहेत. तर जगातल्या सगळ्यात प्रदूषित राजधानीमधे दिल्ली शहर मागची तीन वर्ष टॉपला आहे. संस्थेनं केलेल्या अभ्यासातून या हवेच्या प्रदूषणामुळे २०२० मधे दिल्लीत ५४ हजार मृत्यू झाल्याचं समोर आलंय. तसंच दिल्लीकरांमधे फुफ्फुसाशी संबंधित आजारही मोठ्या प्रमाणात वाढतायत. लॉकडाऊन आणि इतर प्रयत्न करूनही दिल्लीचं प्रदूषण कमी झालेलं नाही. त्यामुळेच त्याची दखल दिल्ली हायकोर्ट आणि सुप्रीम कोर्टाला वेळोवेळी घ्यावी लागलीय. 'वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन' अर्थात डब्ल्यूएचओच्या आकडेवारीनुसार, प्रत्येक वर्षी हवेच्या प्रदूषणामुळे जगभरात ८० लाख लोकांना आपला जीव गमवावा लागतो. यातले १२ लाख भारतीय असतात. दिल्लीकरांना या हवेच्या प्रदूषणाचा फटका सगळ्यात जास्त बसतो. ऑक्टोबर-नोव्हेंबरमधे तर दिल्ली धूर-धुळीने माखलेली असते. या प्रदूषित हवेलाच स्मॉग म्हणतात.

एअर प्यूरिफायरचं मोठं वर्जन

प्रदूषित हवा म्हणजेच स्मॉग दोन प्रकारे तयार होत असल्याचं 'द क्विंट'च्या एका लेखात वाचायला मिळतं. पहिलं म्हणजे पीएम १० ते



पीएम २.५ या धुळीमुळे तयार झालेल्या हवेतल्या कणांनी. आणि दुसरं म्हणजे नायट्रोजन ऑक्साइड, ओझोनमुळे. पीएमचा आकार २.५ आणि १० मायक्रॉन एवढा असतो. ते इतके लहान असतात की ते आपल्या नजरेला दिसत नाहीत. हे कण अगदी सहजपणे नाकातून शरीरात जातात. फुफ्फुसावर परिणाम करतात. वेगवेगळ्या आजारांचा धोका वाढतो. धुळीच्या कणांना घराबाहेर ठेवण्याचं काम एअर प्यूरिफायर करत असतात. घरी एखादी व्यक्ती अस्थमा किंवा श्वसनाच्या इतर कोणत्या कारणाने आजारी असेल तर हल्ली घरच्या घरी एअर प्यूरिफायर बसवले जातात. हवेला स्वच्छ करणारी ही मशीन असते. या प्यूरिफायरमधे हेपा फिल्टर तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. खोलीतली हवा या मशीनमधे ओढली जाते. आणि लगेच बाहेरही सोडली जाते. स्मॉग टॉवर हा एअर प्यूरिफायरच असतो. पण त्याचा आकार मोठा असतो. त्याचं कामही तसंच असतं. प्रदूषित कण स्मॉग टॉवरपर्यंत पोचल्यावर त्यांना आतल्या आत प्रक्रिया करून स्वच्छ केलं जातं. हवा शोषण्यासाठी म्हणून त्यात एअर फिल्टर बसवला जातो. हा एअर फिल्टर हवा शोषल्यावर स्वच्छ हवा वातावरण सोडतो.

भारतातला पहिला स्मॉग टॉवर

२३ ऑगस्टला दिल्लीच्या कनॉट प्लेस भागात मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी देशातल्या पहिल्या स्मॉग टॉवरचं उद्घाटन केलं. त्यासाठी २० कोटी इतका खर्चही आलाय. दिल्लीतल्या वाढत्या हवेच्या प्रदूषणाचा विचार करून जानेवारी २०२० ला सर्वोच्च न्यायालयाने दोन टॉवर उभे करायचे आदेश केजरीवाल सरकारला दिले होते. कॅनॉट प्लेसमधला हा टॉवर 'टाटा प्रोजेक्ट लिमिटेड' या कंपनीने आयआयटी बॉम्बे, आयआयटी दिल्ली आणि अमेरिकेच्या मिनेसोटा युनिवर्सिटीच्या सहकार्याने बनवलाय. पुढची दोन वर्ष आयआयटीच्या दोन्ही संस्था वेगवेगळ्या ऋतू काळात स्मॉग टॉवर कसं काम करतो त्याचा अभ्यास करतील. 'राष्ट्रीय जैवइंधन समन्वय समिती' आणि 'दिल्ली प्रदूषण नियंत्रण मंडळ' यांची या योजनेत महत्वाची भूमिका आहे.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या एका रिपोर्टनुसार, २००९ पासून दिल्लीत पीएम १० मधे २५८ ते ३३५ टक्क्यांपर्यंत वाढ झाल्याचं आढळून आलंय. तर दिल्लीच्या आसपासच्या भागात पीएम २.५ चे कण मोठ्या प्रमाणात आढळून आलेत.

# देश बळीराजाच्या नांगरावर चालतो

## हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांचे विचार; सादोळ्यात शेतकरीपुत्राचा गौरव

▶ प्रतिनिधी

माजलगाव : हवामान खात्याच्या अंदाजावर शेतकऱ्यांची राखरांगोळी होत व्यापारी व कंपन्यांचा फायदा पाहणाऱ्या अंदाजांना बळी ठरणाऱ्या शेतकऱ्यांची आपल्या अभ्यासात्मक निकषातून सुटका करून हवामानाचा अचूक अंदाज देत शेतकऱ्यांची पिके नुसते वाचवलेच नाहीत तर ते भरभराटीला आणण्यात मोठा वाटा उचलणाऱ्या शेतकरी पुत्र, हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांचा सादोळा येथे ग्रामस्थांच्या वतीने मंगळवारी नागरी सत्कार करण्यात आला. दरम्यान, देश व्यापाऱ्यांवर नव्हे तर बळीराज्याच्या नांगरावर चालतो असे विचार हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी मांडले.

या वेळी पंजाबराव डख म्हणाले की, पृथ्वीच्या काळजीसाठी बळीराजाची निर्मिती देवाने केली आहे. देश हा व्यापाऱ्यांवर चालत नसून बळीराजाच्या नांगरावर चालतो. संपूर्ण




लॉकडाऊनमध्ये सगळ्या कंपन्या बंद पडल्या पण बळीराजाची कंपनी चालू होती. शेतकऱ्यांना अचूक हवामान अंदाज देण्यात अजूनही बऱ्याच अंशी व्यापाऱ्यांचा कंपन्यांचा फायदा पहिला जातो ही दुर्दैवी बाब आहे. सोशल मीडियाचा वापर करून दोन लाख शेतकऱ्यांच्या मदतीची कल्पना मला सुचली. आपल्या अभ्यासाचा फायदा इतर शेतकऱ्यांना व्हावा यासाठी समाजमाध्यमांचा खूप मोठा फायदा झाला. मान्सूनची वाटचाल ही पंढरपूरच्या वारी सारखी असून अंदमानातून सुरू झालेली ही वारी हवेचा वेग व दिशा या नुसार चालते. अनेक हवामान शास्त्रज्ञ मला माझ्या हवामानाच्या अचूक अंदाजाच्या स पाठीमागील प्रयोगशाळेविषयी विचारतात म ते व्यावसायिक आहेत पण मी नाही. माझ्याकडची प्रयोगशाळा निसर्ग संकेतांची असल्यामुळे मी ती तुमच्याशी शेअर करू शकत नसल्याचे उत्तर देतो. निसर्गाच्या संकेतकडे दुर्लक्षकरून आपण इकडे तिकडे पाहत बसतो ही आपली चूक आहे असे सांगताना पंजाबराव डख यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. व्यासपीठावर सादोळ्याच्या सरपंच कमलताई सोळंके, उपसरपंच राधाताई शिंदे, शितल डख, सलोनी डख, जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत शेजुळ , पुरुषोत्तम जाधव, व्याख्याते प्रदीप सोळंके, चेअरमन विष्णुपंत सोळंके आदींची उपस्थिती होती. पंजाबराव डख यांची सादोळ्यातून ढोल-ताशांच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली. स्वागतार्थ ठिकठिकाणी रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या. सूत्रसंचालन दिलीप सोळंके यांनी केले तर आभार प्रदीप सोळंके यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी पांडुरंग सोळंके, प्रदीप सोळुंके, संजय सोळंके, धिरज सोळंके, अंकुश शिंदे, गजानन शिंदे, डॉ.अरूण सोळुंके, विक्रम सोळंके, गौतम सोळंके, नामदेव सादोळकर, सोन्याबापू सोळंके, राजू एरंडे, प्रदीप सोळुंके, बबन सोळंके, दिलीप सोळंके, राजाभाऊ सोळंके यांनी परिश्रम घेतले. परिसरातील शेतकऱ्यांची कार्यक्रमास मोठी उपस्थिती होती.



# युवासेनेच्या नेत्र तपासणी शिबिराला प्रतिसाद

## १२० लाभार्थीची तपासणी; २५ रूग्णांवर होणार शस्त्रक्रिया

▶ प्रतिनिधी

माजलगाव : युवासेनेच्या वतीने आयोजित मोफत नेत्र तपासणी शिबिरात १२० रूग्णांची तपासणी करण्यात आली. असून २५ रूग्णांच्या डोळ्यांची शस्त्रक्रिया होणार आहे. या शिबिरात ५० रूग्णांना चष्म्यांचे वाटप शनिवारी करण्यात आले.

माजलगाव शहरातील जिजामातानगर येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी शिवसेना जिल्हाप्रमुख अप्पासाहेब जाधव, कार्यक्रमाचे उद्घाटक आमदार प्रकाश सोळंके तर प्रमुख पाहुणे म्हणून नगराध्यक्ष शेख मंजूर, अनंतराव सोळंके, तुकाराम येवले, सुनिल खंडागळे, दासू बादाडे, शिवमुर्ती कुंभार, सतिश बोटे, अमोल डाके यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक विरभद्र स्वामी यांनी केले. यशस्वितेसाठी अभय मोहरीर, शुभम डाके, सुंदर विके, सचिन दळवी, शेख रहीम, राम कुलकर्णी यांनी पुढाकार घेतला.

# चाटगावच्या विद्यार्थ्यांचे हायटेक अध्यायन

▶ प्रतिनिधी

किल्लेधारूर : कोरोनामुळे दिड वर्षापासून शाळा बंद असल्याने विद्यार्थ्यांना शिक्षणाचे प्रवाहात आणण्यासाठी तालुक्यातील जिल्हा परिषद चाटगाव शाळेच्या शिक्षकांनी पुढाकार घेत तंत्रज्ञानाच्या सहाय्याने 'शिक्षक घरोघरी' हा उपक्रम ऑनलाईन पध्दतीने झूम ॲपच्या माध्यमातून उपक्रम राबविला आहे.

देवदहीफळ केंद्रातील चाटगाव येथील जिल्हा परिषदेच्या शाळेने गटशिक्षणाधिकारी गणेश गिरी, ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी शिवाजी अंडील केंद्रप्रमुख सुरवसे, मुख्याध्यापक अर्जुन मुंडे यांच्यासह सर्व शिक्षक वृंद यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून 'शिक्षक घरोघरी' या उपक्रमाचे स्वागत व कौतुक चाटगाव परिसरात होत आहे. कोरोना साथरोगामुळे शाळा सध्या बंद आहेत. शाळा बंद असल्या तरी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून चाटगाव शाळेतील शिक्षक ५ वी ते ८ वी इयत्तेला काळे , परदेशी, सोमवंशी, परळकर, विद्यार्थ्यांना दररोज संध्याकाळी ७ ते ९ या वेळेत झूम ॲपच्या माध्यमातून अध्यापन करतात. दिवसभर अँड्रॉइड मोबाईल पालकांच्या हाती असल्यामुळे पालकांच्या व विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी संध्याकाळची वेळ ऑनलाईन तासिकासाठी निवडली गेली.

**टि.सी.हरवला आहे**

सचिन विठ्ठलराव रत्नपारखी या नावाचा बी.एस्सी अंतिम वर्षाचा पासचा टी.सी. माजलगाव ते औरंगाबाद एस.टी. प्रवासात हरवला आहे. तरी कोणाला सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

संपर्क क्र.
९६५७२४१२२५

**कागदपत्रे हरवले आहे**

महेश सुमंतराव बादाडे या नावाच्या मालकीच्या गाडीचे गाडी नंबर एमएच ११ ए.के.६८४० कागदपत्रे (आर.सी.बुक) हे माजलगाव ते शहाजानपूर प्रवासादरम्यान हरवले आहे. तरी कोणाला सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

संपर्क क्र.
७०२०२०७१०९

# सुंदरराव सोळंके सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या कार्यक्रमाचे उद्घाटन

▶ प्रतिनिधी

माजलगाव : मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या येथील लोकनेते सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या स्थापनेस ५० वर्षे पूर्ण होत असल्याने महाविद्यालय सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत आहे. त्या अनुषंगाने गुणवंतांचा सत्कार, कोविड लसीकरण शिबिराने शनिवारी सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.



आमदार प्रकाश सोळंके, माजी आमदार मोहनराव सोळंके, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुरेश साबळे, डॉ.मधुकर घुबडे, डॉ.गजानन रूद्रवार, विजयकुमार सोळंके, ॲड.भानुदास डक, सत्यप्रकाश रूद्रवार, संतोष मुळी, मुसद्दीक बाबा, भारत रूद्रवार, संदिपान डाके, डॉ.एम.ए.वदुद खान, प्रा.निळकंठ साबळे, अण्णाभाऊ वगरे, प्राचार्य जी.के.सानप, उपप्राचार्य डॉ.नंदकिशोर मुळे यांची उपस्थिती होती.

यावेळी महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा व पीएचडी प्राप्त प्राध्यापकांचा सत्कार करण्यात आला. कोविड लसीकरण शिबिरात ३२७ विद्यार्थ्यांना लस देण्यात आली. बोलताना आमदार सोळंके म्हणाले की, उज्वल यशाची परंपरा असलेल्या सुंदरराव सोळंके महाविद्यालय सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत आहे.

ग्रामीण भागातील बहुजन समाजाला दर्जेदार शिक्षण देण्याचे काम करत आहे. येथे शिक्षण घेउन अनेक विद्यार्थी घडले ही अभिमानाची बाब असल्याचे सांगितले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ.जी.के.सानप यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.एम.ए.कव्हळे यांनी तर आभार डॉ.भाऊसाहेब राठोड यांनी मानले.

# तालुकाध्यक्षपदी रहिम खान पठाण तर सचिवपदी वसिम पठाण

▶ प्रतिनिधी

माजलगाव : येथील माऊली ट्रान्सपोर्ट या ठिकाणी मोटर मालक-चालक व ट्रान्सपोर्ट संघटनेची बैठक पार पडली. या तालुकाध्यक्षपदी रहीम खान पठाण उपाध्यक्षपदी युवराज जगताप तर सचिवपदी वसिम पठाण यांची निवड करण्यात आली आहे.

या बैठकीला शेख सल्लाउद्दीन फिरोज ईनामदार,



अशोक कुंभार, यांच्या उपस्थिती होती. उर्वरित कार्यकारिणीत सचिव वसिम पठाण यांच्यासह सहसचिव आजम खान, खजिनदार शेख सत्तार, संघटकपदी नसिर पठाण, सुरेश चौरे, कृष्णा अलकुटे, गणेश काळे यांची निवड करण्यात आली आहे. यावेळी अध्यक्ष फेरोज इनामदार, उपाध्यक्ष अशोक कुंभार, सचिव शेख सल्लाउद्दीन उपस्थित होते.




# रूपचंद आभारे उत्कृष्ट तलाठी म्हणून सन्मानित

▶ प्रतिनिधी


माजलगाव : तालुक्यातील सोन्नाथडी सज्जाचे तलाठी रूपचंद आभारे यांचा शेतकरी संघटनेतर्फे उत्कृष्ट तलाठी म्हणून सत्कार करण्यात आला. सोन्नाथडी, गुंजथडी, शुक्लतीर्थ लिमगाव, सुरूमगाव या गावचे तलाठी आभारे यांनी मागील पाच वर्षापासून गावात शासकीय योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहचवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत आहेत.

कोविड -१९ या संसर्गजन्य रोगाच्या काळात चारही गावात केलेला औषध पुरवठा उल्लेखनीय स्वरूपाचा आहे. तसेच दरवर्षी त्यांच्या वाढदिवसानिमित्त गावकऱ्यांतर्फे आयोजित रक्तदान शिबिर हे सामाजिक कार्याची पोचपावती असते. सदर कार्यक्रमास शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अध्यक्ष अशोकराव नरवडे, गजानन खामकर, सत्कारमूर्ती पंजाबराव डख आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

# शेतात अस्थी विसर्जन करण्याचा क्रांतिकारी निर्णय

## आबेगाव येथील शेजुळ कुटुंबियांचे परिवर्तनीय पाऊल

▶ प्रतिनिधी



माजलगाव : तालुक्यातील आबेगाव येथील सामाजिक कार्यकर्ते इंजि.अरूणराव शेजुळ (वय ६५) यांचे दि.२७ ऑगस्ट रोजी माजलगाव तेलगाव रोडवरील रिलायन्स पेट्रोल पंपाजवळ अपघाती निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर जन्मगाव आबेगाव येथील गोदावरी नदीच्या काठावर असलेल्या स्मशानभूमीत शनिवारी अंत्यविधी पार पडला.

सामाजिक कार्यकर्ते अरूणराव शेजुळ यांचे विचार व कार्याला अनुसरून तसेच त्यांच्या इच्छेनुसार त्यांच्या अस्थी गोदावरी नदीत विसर्जित न करता, शेतात विसर्जित करून त्या ठिकाणी स्मृती वृक्षाचे रोपण केले. तसेच तीन दिवसांत दुखवटा संपवण्याचा क्रांतीकारक निर्णय शेजुळ कुटुंबीय व सर्व गावकरी यांनी घेतला. याप्रसंगी डॉ. आत्माराम शेजुळ, प्रा. अनुशाल्व शेजुळ, जि.प.सदस्य चंद्रकांत शेजुळ आदींची उपस्थिती होती.

# भगीरथ तोडकरी यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव















▶ प्रतिनिधी

माजलगाव : वर्तमान माध्यम समुहाचे मुख्य संपादक भगीरथ तोडकरी यांच्या वाढदिवसानिमित्त विविध स्तरातून मान्यवरांनी त्यांचा यथोचित सन्मान करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

माजलगाव येथील धर्मनाथ अर्बनमध्ये संस्थेचे उपाध्यक्ष गोविंद जोगडे, व्यवस्थापक विजय मते, बीड जिल्हा पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष पत्रकार तुकाराम येवले, माजी उपनगराध्यक्ष सुनिलराव खंडागळे, सचिन टाक, शेषराव आबुज, संपादक बालासाहेब फपाळ,



गोवर्धन बडे, पत्रकार दत्ता येवले, सिध्देश्वर येवले, हरिश गावडे, महेश येवले, चाटगाव येथे संपादक बाबा देशमाने, दिंद्रुड येथे अक्षरा एन्टरप्रायजेसचे संचालक उध्दवराव केकान, पत्रकार सुनिल चौरे, अशोकराव गवळी, आम आदमी पार्टीचे सहदेव खंडागळे, दिनेश नरहीर, साई ऑफसेटचे संचालक संकेत लांडगे, पिंकू टाकणखार, रवि उगले, बालासाहेब फपाळ, गोवर्धन बडे, प्रभू श्रीरामचंद्र प्रतिष्ठानचे अध्यक्ष कृष्णा कानडे, युवासेनेचे शहरप्रमुख विक्रम शिंदे, चिंतेश जोशी, शैलेश देशमुख, सचिन पट्टेकर आदींकडून सन्मान स्विकारताना संपादक भगीरथ तोडकरी.

# ग्राहकांचा विश्वास हाच यशाचा मार्ग

## न्यू पंकज पेट्रोलियमच्या उद्घाटनाप्रसंगी आमदार प्रकाश सोळंके यांचे प्रतिपादन

▶ प्रतिनिधी

वडवणी : दर्जा आणि गुणवत्ता टिकून ग्राहकांचा विश्वास संपादन करणे हाच यशाचा मार्ग आहे, असे प्रतिपादन आमदार प्रकाश सोळंके यांनी केले. ते वडवणी येथे न्यू पंकज पेट्रोलियमच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

या कार्यक्रमास बीड जिल्हा परिषदेचे सभापती जयसिंग सोळंके यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. वडवणी येथील ॲड.आनंद काळे, इंजि.अक्षय काळे संचलित न्यू पंकज पेट्रोलियमच्या उद्घाटनाप्रसंगी आमदार प्रकाश सोळंके यांनी उपस्थिती लावली. यावेळी पुढे बोलताना आमदार प्रकाश सोळंके म्हणाले,



ग्राहकांना चांगली सेवा आणि विश्वास दिला तर व्यवसायात चांगल्या संधी निर्माण होतात. काळे कुटुंबाने या व्यवसायाच्या माध्यमातून यशाची शिखरे पार करावी ह्या शुभेच्छा या निमित्ताने दिल्या. खऱ्या अर्थाने आज जवळपास प्रत्येकाकडे एक दुचाकी आहे यापैकी शेतकरी बांधव दुचाकी वापरण्याचे प्रमाण लक्षणीय आहे. याकरिता या पेट्रोल पंपाच्या माध्यमातुन ईथेनॉल विक्रीची सुविधा उपलब्ध करावी, पेट्रोलच्या दरापेक्षा इथेनॉल हे २७ रूपये ते २८ रूपयांनी स्वस्त आहे. यामुळे सर्वसामान्य जनतेची होणारी आर्थिक झळ कमी होईल, असेही आमदार सोळंके म्हणाले.

# कैकाडी महासंघाच्या जिल्हाध्यक्षपदी लक्ष्मण गायकवाड यांची निवड

▶ प्रतिनिधी

माजलगाव : अखिल भारतीय कैकाडी महासंघाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी लक्ष्मणराव शेषेराव गायकवाड यांची शुक्रवारी निवड झाली. कैकाडी महासंघाचे संस्थापक अध्यक्ष संजय दादाराव मेडे यांनी त्यांना नियुक्तीपत्र दिले आहे.



माजलगाव शहरातील नवनाथ नगर येथील रहिवासी असलेले लक्ष्मण गायकवाड हे सामाजिक कार्यकर्ते आहेत. नेहमीच समाजातील प्रश्न सोडविण्यास ते अग्रेसर असतात. या सामाजिक कार्याची दखल घेत अखिल भारतीय कैकाडी महासंघाचे संस्थापक अध्यक्ष संजय दादाराव मेडे, राज्य कार्याध्यक्ष अमोल माने, राज्य सचिव शरद माने यांनी लक्ष्मणराव गायकवाड यांच्याकडे बीड जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी दिली आहे. या पूर्वी कैकाडी समाज संघटनेचे तालुकाध्यक्ष या पदावर त्यांनी काम केलेले आहे. गायकवाड यांच्या निवडीबद्दल धोंडीराम जाधव, गोरख मेंडके, राजेश मेंडके, बंडू गायकवाड, बाळू मेंडके, अंकुश मेंडके आदींनी स्वागत करून त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. गायकवाड यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# 'अबॅकस'मध्ये कार्तिकी बेद्रे, अक्षरा दराडे यांची उत्कृष्ट कामगिरी

▶ प्रतिनिधी

बीड : देशपातळीवरील ऑनलाइन अबॅकस स्पर्धेतील स्पर्धा दिनांक १० ऑगस्ट रोजी झाली. देशातील विविध भागांमधून पाचशेपेक्षा जास्त पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना सहभाग नोंदवला. यात बीडच्या ३५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेत उत्कृष्ट क्रमांक मिळविले आहेत. यात कार्तिकी बेदरे आणि अक्षरा दराडे यांनी उत्कृष्ट कामगिरी केली असून पदक मिळविले आहे.



विद्यार्थ्यांमधील सुप्तगुणांचा विकास करण्याच्या मार्गाने अबॅकस गणितीय पध्दतीचा उपयोग होतो. बीड शहरातील अबॅकस स्टडी केंद्राद्वारे आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य स्तरावर, अबॅकस चॅम्पियनशिप आयोजित केल्या जातात. कार्तिकी बेदरे आणि अक्षरा दराडे यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरील अतिशय मानद मास्टर अबॅकस पदक मिळवले. असून अबॅकस स्टडी सेंटरचे प्रमुख डॉ.एस.ए.घोडके, कार्यक्रमाचे प्रमुख वैभव शिंदे, प्रमुख अतिथी संतोष शेकडे यांनी बहाल करण्यात आलेली आहे. प्रथम लेबल पासूनच कार्तिकी बेंद्रे आणि अक्षरा दराडे यांनी सतत प्रथम क्रमांकाने यश मिळवता आलेल्या आहे, त्यांच्या मास्टर अबॅकस पदकाच्या यशामध्ये आई-वडील आणि तिला शिकवत असलेले सर्व शिक्षक ज्येष्ठ यांचा सिंहाचा वाटा आहे असे त्यांनी सांगितलेले असून अनुष्का दराडे सुद्धा उत्कृष्ट स्पर्धक म्हणून समावेश केलेला आहे. समाजातील सर्व स्तरांमधून कार्तिकी आणि अक्षरा यांचे अभिनंदन होत असून उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत, तसेच सप्टेंबर २०२१ महिन्यामध्ये होणाऱ्या इंटरनॅशनल अबॅकस चॅम्पियनशिप करीता वरिल सर्व विद्यार्थ्यांची निवड झालेली आहे असे जिल्हा अबॅकस वितर एस.ए.घोडके यांनी सांगितले.

# शेकाप नेते भाई ॲड.नारायण गोले पाटील यांचा सन्मान

माजलगाव : वैद्यकीय विद्यार्थी परिषद महाराष्ट्र राज्य व पटेल फाउंडेशन बीड यांच्या संयुक्त विद्यमाने कोरोना काळात शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सातत्य ठेवून लढा देणारे शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ड. नारायण गोले पाटील यांना कोविड योद्धा पुरस्कार दिला. या पार्श्वभूमीवर जिल्हा व सत्र न्यायालयातील माजलगाव वकील संघाच्या वतीने भाई ॲड. नारायण गोले पाटील यांचा सत्कार करण्यात आला.



# उपप्राचार्यपदी प्रा.मुळे, प्रा.कव्हळे यांची नियुक्ती

▶ प्रतिनिधी

माजलगाव : येथील सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या उपप्राचार्य पदी अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा.डॉ. एन.के. मुळे, प्रा.डॉ.एम.ए.कव्हळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या समन्वयकपदी डॉ.ज्ञानेश्वर शिंदे यांची नियुक्ती झाली आहे. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना महाविद्यालय विकास समिती सदस्य ॲड.भानुदासराव डक यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले.











मुदत ठेव योजना (F.D.)

| कालावधी | व्याजदर |
|---|---|
| १५ दिवस ते ९० दिवस | ७% |
| ९१ दिवस ते १८१ दिवस | ८% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ९% |
| ३६६ दिवस ते पुढे | ९.५% |

आवर्त ठेव योजना (आर.डी.)

| मासिक हप्ता | कालावधी | जमा रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|---|
| ५०० | ७२ महिने | ३६००० | ५०००० |
| १००० | ७२ महिने | ७२००० | १००००० |
| २००० | ७२ महिने | १४४००० | २००००० |

मासिक ठेव योजना

| मासिक हप्ता | कालावधी | जमा रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|---|
| ५०० | १२ महिने | ६००० | ६३५० |
| १००० | १२ महिने | १२००० | १२६९९ |
| ५०० | २४ महिने | १२००० | १३३९३ |
| १००० | २४ महिने | २४००० | २६७८५ |
| ५०० | ३६ महिने | १८००० | २१२०५ |
| १००० | ३६ महिने | ३६००० | ४२४१० |


आधुनिक विचारांचे वर्तमान
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन ,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय, 23,मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022.